



# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २५९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०१ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## आजपासून राज्यात जनगणना सुरु होणार, नागरिक घरच्या घरी ऑनलाइन स्व गणना करु शकणार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** आजपासून राज्यात जनगणना सुरू होणार आहे. यंदा पहिल्यांदाच स्व-गणना अशी नवीन प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यासाठी स्व-गणना पोर्टल १ मे ते १५ मे पर्यंत कार्यरत होणार आहे. अवघ्या १५ ते २० मिनिटात स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करण्यात येता येणार आहे. या स्व-गणनेदरम्यान कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याची आवशक्यता नाही. राज्याच्या जनगणना कार्य संचालनालयच्या संचालक निरुपमा डांगे यांनी याबाबत माहिती दिली आहे. राज्यातील नागरिकांना ाश.लशपीिी.सीं.ळप या संकेतस्थळावर जावून स्वत:ची माहिती ऑनलाइन भरता येईल.

यंदाची १६ वी जनगणना आहे. दोन टप्प्यात यंदाची जनगणना पार पडणार आहे. या प्रक्रियेसाठी २ लाख ६४ हजार पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. स्व-गणना पूर्ण झाल्यावर एस इ आयडी दिला जाणार आहे. स्व-गणना ही बंधनकारक नसून ती ऐच्छिक आहे. १६ मे १४ जून या कालावधीत अधिकारी घराघरात जावून पडताळणी करणार असून संकलित केलेले सर्व माहिती ही गोपनीय ठेवली जाणार आहे. सपूर्ण आणि अचूक माहिती अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन निरुपमा डांगे यांनी केले आहे.

**जनगणना कार्य संचालनालय नेमकं काय म्हणाले?**

देशात प्रथमच जनगणनाची माहिती डिजीटल माध्यमातून घेतली जाणार आहे. स्व-गणना ही १ मे ते १५ मे या पंधरा दिवसांच्या कालावधीत लोकं करु शकतील. जर कुणी स्व-गणना केली नसेल तरी काळजी करण्याची आवश्यकता नाही. माहिती गोळी करण्यासाठी घरोघरी १६ मे १४ जून या काळात जनगणना करणारे अधिकारी राज्यातील प्रत्येक घरास भेट देतील, अशी माहिती जनगणना कार्य संचालनालयच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी दिली.


जनगणना २०२७ साठी राज्यातील सर्व जिल्हे/तालुके/शहरे/गावे यांच्या प्रशासकीय सीमा १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीसाठी प्रशासकीय सीमा गोठवण्यात आल्या आहेत, म्हणजेच त्यात कुठलेही बदल करता येणार नाहीत. महाराष्ट्र शासनाने या संदर्भातील राजपत्र अधिसूचना १५ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर २३ डिसेंबर २०२५ रोजी राज्य शासनाने जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना प्रकाशित केली; याद्वारे क्षेत्रीय कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक राज्य/जिल्हा/वैधानिक शहर/तालुका स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा उभारण्यात आली.

राज्य शासनाने १६ फेब्रुवारी २०२६ रोजी ३३ प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह-यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

## महाराष्ट्राला मोठा दिलासा! तापमानात घट, काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, पुणे :** राज्यभरात काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढला होता. मात्र तीव्र उकाड्यानंतर आता हवामानात काहीसा बदल जाणवू लागला असून, गेल्या दोन दिवसांत तापमानात घट नोंदवली गेली आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून थोडासा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागातील शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिली आहे.



मागील काही दिवसांत राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानाने ४६ अंश सेल्सिअसचा उच्चांक गाठला होता. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांत उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणावर वाढली होती. मात्र, सध्या परिस्थिती काहीशी स्थिर होताना दिसत असून तापमानात घट झाल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. एस डी सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, विदर्भात गेल्या दोन दिवसांत तापमान सुमारे २ अंश सेल्सिअसने कमी झाले आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातही अशीच स्थिती पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी आजही तापमानात घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यातही मागील काही दिवसांच्या तुलनेत तापमानात थोडीशी घट जाणवली आहे. मात्र, येत्या काही दिवसांत पुण्यात तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उकाडा पूर्णपणे कमी झाला नसला तरी तीव्रतेत काहीशी घट झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, विदर्भासाठी एक दिलासादायक अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. २ तारखेपासून विदर्भात पावसाची शक्यता असल्याचे सानप यांनी सांगितले. यामुळे त्या भागातील तापमान आणखी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुढील ५ ते ७ दिवस विदर्भात तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत राहू शकते, तर मराठवाड्यात ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान तापमान राहण्याचा अंदाज आहे. राज्यातील अनेक भागांत पुढील काही दिवस तापमान सुमारे ३८ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे.

एकूणच, उकाड्याची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली असली तरी पूर्णतः दिलासा मिळण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. काही भागात पावसाची शक्यता असल्यामुळे शेतकऱ्यांनी पिकाची आणि नागरिकांनी देखील स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

## विधान परिषद निवडणूक बिनविरोध होणार, ९ उमेदवार रिंगणात, कोणत्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** आज विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. शेवटच्या दिवशी राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला होता. विधान परिषदेसाठी ९ जागांचा कोटा होता. त्यापैकी पाच जागा या भाजपच्या वाट्याला आल्या, भाजपच्या पाच उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे, तर शिवसेना शिंदे गटाकडून दोन आणि राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना ठाकरे गटाकडून प्रत्येकी एका उमेदवाराने अर्ज दाखल केल्यामुळे आता ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. भाजपकडून अतिरिक्त उमेदवार देण्याची शक्यता होती, मात्र भाजपानं अतिरिक्त उमेदवार न दिल्यानं आता या निवडणुकीसाठी ९ चं उमेदवार रिंगणात आहेत.

विधान परिषद निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव देखील चर्चेत होतं. जर उद्धव ठाकरे ही निवडणूक लढवणार असतील तर आम्ही उमेदवार देणार नाही, अशी भूमिका भाजप आणि शिवसेना शिंदे गटाने घेतली होती. काँग्रेसची देखील तीच भूमिका होती. मात्र ऐनवेळी शिवसेना ठाकरे गटाकडून अंबदास दानवे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली, त्यामुळे शिवसेना शिंदे गट, भाजप आणि काँग्रेस काय भूमिका घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. काँग्रेसने दानवे यांना पाठिंबा दिला तर शिवसेना शिंदे गट आणि भाजपकडून देखील कोणताही अतिरिक्त उमेदवार देण्यात न आल्यानं आता ही निवडणूक बिनविरोध होणार आहे.



भाजपकडून पाच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत, ज्यामध्ये सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार यांच्या नावाचा समावेश आहे. तर प्रज्ञा सातव या विधान परिषदेची पोटनिवडणूक लढवणार आहेत. शिवसेना शिंदे गटाच्या दोन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत, ज्यामध्ये नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांच्या नावाचा समावेश आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून झिशान सिद्दिकी आणि शिवसेना ठाकरे गटाकडून अंबादास दानवे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीत कोणीही अतिरिक्त उमेदवार दिला नसल्यानं ही निवडणूक आता बिनविरोध होणार आहे.

## ‘पैशाच्या पावसाचे’ आमिष दाखवून भोंदूबाबाकडून १ कोटींना गंडा

### पारनेर तालुक्यातील निघोज येथील पाच जणांची फसवणूक

### विश्वास संपादन करून ओढले जाळ्यात, आरोपी पसार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील निघोज येथे अंधश्रद्धा आणि झटपट श्रीमंतीच्या आमिषाला बळी पडून पाच जणांची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शिरूर येथे वास्तव्यास असल्याचे सांगणार्या एका भोंदूबाबाने पैशांची पूजा केल्यास १० पट परतावा मिळेल असे आमिष दाखवून संबंधितांना जाळ्यात ओढले.

प्राप्त माहितीनुसार, निघोजमधील एका व्यक्तीशी ओळख वाढवत भोंदूबाबाने आपल्याकडे अलौकिक शक्ती असल्याचा दावा केला. बनावट भक्तांच्या माध्यमातून विश्वास संपादन करून त्याने संबंधित व्यक्तीला तसेच इतर चार जणांना पैशांच्या पावसाचे स्वप्न दाखवले. त्यानंतर पाचही जणांनी जमीन गहाण ठेवणे, दागिने तारण ठेवणे तसेच सावकारांकडून कर्ज घेऊन एकूण १ कोटी रुपयांची रक्कम उभी केली.

दरम्यान, ठरलेल्या दिवशी रात्रीच्या वेळी पूजा आयोजित करण्यात आली. पूजेदरम्यान भोंदूबाबाने सर्वांना मौन पाळण्यास सांगून तीर्थ दिले. हे तीर्थ घेतल्यानंतर काही वेळातच सर्वजण बेशुद्ध झाल्याचे सांगण्यात येत आहे. शुद्धीवर आल्यानंतर भोंदूबाबा आणि पैशांची रक्कम दोन्ही गायब झाल्याचे लक्षात आले. फसवणूक झाल्यानंतर संबंधितांनी शिरूर तसेच गुजरातपर्यंत भोंदूबाबाचा शोध घेतला. मात्र त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. या घटनेबाबत गावात दबक्या आवाजात चर्चा सुरू असली तरी अद्याप पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल झालेली नाही. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंधश्रद्धा व भोंदूगिरीविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता सजग राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## वरसई-घोटे रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात ७ मे रोजी ‘सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह’



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.३०, पेण :** पेण तालुक्यातील वरसई फाटा ते वरसई आणि वरसई ते घोटे या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे प्रवास धोकादायक बनला असून वारंवार अपघात घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर सत्यशोधक सर्वोदया संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने येत्या ७ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता वरसई फाटा बस थांबा जवळ ‘सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह’ करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

संघटनेने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, वरसई फाटा ते वरसई हा सुमारे ३ किमी आणि वरसई ते घोटे हा सुमारे ५ किमी रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाले आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान, दुचाकीस्वारांचे अपघात तसेच शालेय विद्यार्थ्यांचे हाल वाढले आहेत. काही ठिकाणी बस सेवा विस्कळीत होत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होत आहे.

नागरिकांकडून विविध कर भरूनही रस्त्यांची दुरुस्ती होत नसल्याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ रस्ता दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

## ब्रिक्स प्रतिनिधी मंडळाची ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.३०, चंद्रपूर :** ‘ब्रिक्स २०२६’ चे अध्यक्षपद भारताकडे आहे. त्या अनुषंगाने ब्रिक्स सदस्य देशातील प्रतिनिधी मंडळाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली. भारतात विकसित होत असलेल्या वन्यजीव संवर्धन पध्दती व समुदायाधारित शाश्वत उपजिविका उपक्रमाचा त्यांनी येथे प्रत्यक्ष अनुभव घेतला.

१८ व्या ब्रिक्स परिषदेनिमित्त राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीने २० एप्रिल ते २६ एप्रिलदरम्यान ’ ब्रिक्स यंग टॅक्स प्रोफेशनल्स वर्किंग ग्रुप- क्षमता वृध्दी कार्यशाळा’ आयोजित केली होती. या कार्यशाळेचा एक भाग म्हणून ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्प भेटीचे आयोजन करण्यात आले होते. भेटीची सुरुवात पहाटेच्या सफारीने झाली. ज्यात प्रतिनिधींना प्रकल्पातील विज्ञानाधिष्ठित व व्यवस्थापनकेंद्री संवर्धन पध्दतीचा सविस्तर परिचय देण्यात आला. यावेळी अत्याधुनिक गस्त व्यवस्था, ’ रिअल टाईम- डिजीटल मॉनिटरिंग’ व गुप्त माहितीवर आधारित कारवाई, गवताळ कुरणांची निर्मिती व सौरऊर्जे वर चालणाऱ्या पाणवठ्यांची उभारणी व देखभाल, भक्षक- भक्ष्य संतुलन राखण्यासाठी तसेच अधिवास जोडणीसाठी स्थाणांतरणसारख्या धोरणात्मक उपाययोजना आदी विषयांवर अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

सायंकाळी प्रतिनिधी मंडळाने ताडोबा परिसरातील स्वच्छतेसाठी प्रसिध्द असलेल्या सातारा गावाला भेट दिली. यानंतर पारंपारिक आदिवासी नृत्य सादर करण्यात आले. ज्यातून मध्य भारताच्या समृध्द सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले. भेटीच्या शेवटी क्षेत्र संचालक तसेच वनाधिकारी यांच्यासोबत संवाद सत्र आयोजित करण्यात आले. ब्रिक्स प्रतिनिधींनी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाच्या कार्याचे कौतुक करीत भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदादरम्यान संवर्धन क्षेत्रात घेतलेल्या पुढाकारांचेही अभिनंदन केले.




## बुद्ध पौर्णिमा

आज १ मे, आज वैशाख पौर्णिमा आजच्याच दिवशी भगवान गौतम बुद्धांचा महामाया व राजा शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुम्बिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात. ही तिथी वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्वाची तिथी मानली जाते. बुद्ध पौर्णिमा अर्थात वैशाख पौर्णिमा आणखी तीन कारणांसाठी पवित्र मानली जाते ती म्हणजे वैशाख पौर्णिमेला तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला होता, वैशाख पौर्णिमेला बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि वैशाख पौर्णिमेलाच बुद्धांचे महानिर्वाण झाले होते म्हणून या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असेही म्हणतात. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली जाते. भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे१९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. आज बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली जातात. बौद्ध बांधव यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देतात. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधव बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना करतात. बुद्ध मूर्तीजवळ दीपप्रज्वलन करतात. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प करतात. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळ्या बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला. नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते.

ती चार आर्य सत्य म्हणजे

१) मानवाला दुःख असते.
२) दुःखाला कारण असते.
३) दुःखाचे निवारण करता येते.
४) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.

# जागतिक कामगार दिन !


**श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे**
**संपर्क : ९९२२५४६२९५**

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधान न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला.

यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून




साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते. लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो!

**जगभरातील कामगारांना**
**कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!**

# ‘महाराष्ट्र’ देशा – ‘पवित्र’ देशा...




ज्याच्या नवातच 'महा' विशाल राष्ट्र असा नामोल्लेख आहे तो आपला महाराष्ट्र आपला स्थापना दिन साजरा करीत आहे. महाराष्ट्र नावाने ओळखले जाणारे आपले हे देशातील एकमेव राज्य आहे.भाषावार प्रांत रचनेच्या सुत्रानुसार बॉम्बे पुनर्गठन अधिनियम १९६० नुसार तत्कालीन मुंबई राज्याचे विभाजन होऊन गुजरात, महाराष्ट्र राज्यांची निर्मिती केली गेली. १ मे १९६० रोजी तत्कालीन पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र राज्य निर्मितीचा 'मंगल कलश' राज्याचे जेष्ठ नेते कै. यशवंतराव चव्हाण यांच्या हाती सोपवला. मुंबई आणि नागपूर (उप राजधानी) अशा दोन राजधानी शहरे राज्याला लाभली आहेत.

मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे यासाठी मोठी चळवळ उभारली गेली होती, त्यासाठी १०५ हुतात्म्यांना राज्याने गमावले आणि मुंबई महाराष्ट्राला मिळाली,एवढेच नव्हे तर मुंबई राज्याची राजधानी बनली. मुंबई ला वेगळे ठेवण्याचे बरेच प्रयत्न झाले, बरेच रणकंदन माजले. मात्र तेव्हा मराठी माणसाच्या 'मोडेन पण वाकणार नाही' या प्रवृत्तीचा परिचय देशाला झाला, कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री असलेल्या कै. सी. डी देशमुख यांनी थेट मंत्रीपदाचा राजीनामा देऊन टाकला. मराठी बहुल असलेल्या कर्नाटकातील कारवार, निपाणी, बेळगाव हा भाग महाराष्ट्राला मिळावा यासाठी राज्याचा आजही लढा चालू आहे. हा वाद सुप्रिम कोर्टात प्रलंबित आहे मात्र महाजन आयोगाचा हवाला देत कर्नाटक हा विषय संपल्याची भुमिका घेत आहे. मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश या भागाचा मिळून बनलेल्या महाराष्ट्राला ७९० किमी. किनारपट्टी लाभली असुन राज्याचे श्रेत्रफळ अंदाजे ३,०७,६९० चौ. किमी. इतके आहे.खरा विकास फक्त पश्चिम महाराष्ट्राचा झाला अशी ओरड नेहमीच होत असते मात्र विदर्भातील कै. वसंतराव नाईक, सुधाकर राव नाईक, कन्नमवार देवेंद्र फडणवीस यांनी मिळून सर्वाधिक काळ राज्याचे नेतृत्व केले आहे, तर मराठवाड्यातील कै. शंकरराव चव्हाण त्यांचे पुत्र अशोक चव्हाण यांनी राज्याचे नेतृत्व केले आहे. आता देखील नागपूरचे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत.

मुंबई ही मुळ सात बेटांची बनली आहे आणि कोळी समाज हा इथला मुळचा मुंबईकर,कालांतराने हे मुंबई शहर देशाची आर्थिक राजधानी, त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवरचे शहर म्हणून मुंबईने आपली ओळख जगभर निर्माण केली आहे. राज्याच्या सर्व पक्षीय धुरिणांनी केलेल्या संयुक्त प्रयत्नांचे फलित म्हणजे महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते. त्याच बरोबर एक पुरोगामी राज्य म्हणून राज्याने आपली ओळख निर्माण केली आहे. मुंबईचे रुपडे पालटु लागले आणि मुळ मराठी माणसाची ओळख असलेली मुंबई सर्वांना सामावून घेणारे कॉस्मॉपॉलिटिन शहर बनले,आणि हळुहळु परप्रांतीयाकडुन एक एक उद्योगधंदे काबीज करणे सुरू झाले. उद्योगधंद्यात गुजराती, मारवाडी, तर छोट्या मोठ्या व्यवसायात तामीळ, कर्नाटकी लोकांनी तर नोकरी मधे दक्षिण भारतीयांनी जम बसविणे सुरू केले आणि मराठी माणसामध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ लागली त्याचा वाचा फोडण्यासाठी कै. प्रबोधनकार ठाकरे यांनी १९६६ मध्ये शिवसेनेची स्थापना केली, 'बजाव पुंगी हटाव लुंगी' अंदोलन केले गेले. मराठी माणसात एकीची भावना निर्माण होऊ लागली, मात्र तरी देखील मुंबईतुन मराठी माणूस मोठ्या प्रमाणावर हद्दपार झाला आहे हे वास्तव आहे आणि त्याची जागा परप्रांतीयांनी व्यापली आहे. मुंबईचे महत्त्व करण्याचे हरतऱ्हेने विशेषतः गुजराती लॉबी कडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत आणि दुर्दैवाने आमचे राज्यकर्ते, सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, मराठी माणूस हा एकसंध नसल्याने हे प्रकार दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. 'डबल ईंजीना'चे सरकार असुन देखील महाराष्ट्राच्या तोंडचा घास काढून कधी गुजरातला तर कधी कर्नाटक ला भरवला जातो आणि आम्ही आपापसातच भांडत बसतो.मुंबई ला महाराष्ट्रापासून वेगळे केले जाणार न जमल्यास मुंबई केंद्र शासित प्रदेश केला जाणार आणि कालांतराने गुजरातला जोडली जाणार अशा चर्चा अधुन मधुन होतात आणि तसे काही होणार नाही असे ठाम पणे सांगितले जाते,मात्र रात्र वैऱ्याची आहे याची जाणीव प्रत्येक मराठी माणसाला ठेवायला हवी, त्याच बरोबर मराठी माणसाला दुहीचा शाप जडला आहे तो बदलण्याची गरज आहे. प्रादेशिक अस्मिता, एकी काय असत ते दाक्षिणात्यांकडुन शिकण्यासारखे आहे.

मराठी माणूस लढवय्या आहे मात्र आपण मैदानात जिंकतो आणि तहात हरतो


**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

हा आपला इतिहास आहे. मुंबई ही मराठी माणूस, महाराष्ट्राची आन, बान, शान आहे ती अशी सहजासहजी तोडणे शक्य नाही मात्र यदाकदाचित असे काही झाले तर मराठी माणूस पेटुन ऊठल्याशिवाय रहाणार नाही.मुंबई सह महाराष्ट्र एकसंघ होता, आहे आणि भविष्यातही राहिल. राज्यात सध्या तीन पक्षांच्या महायुतीचे सरकार आहे. महाराष्ट्र दिन साजरा होत असताना राज्याची तिजोरी, राज्यावरील कर्जाचा डोंगर, शेतकर्यांच्या आत्महत्या, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांचे आव्हान आहे. कितीही नाकारले तरी कायद व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, महाराष्ट्रात सर्व काही आलबेल, सुजलाम सुफलाम आहे अशी परिस्थिती नाही. विकासाच्या मृगजळामागे धावतांना रस्ते बांधले म्हणजे विकास झाला असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र धावतांना दिसला पाहिजे यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करायला हवेत. महाराष्ट्र दिन साजरा होत असतांना राज्यासमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत, काळ कसोटीचा आहे त्यातच पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूबाबां, भोंदुगिरी ने राज्याला विळखा पडला आहे, काहीजण महाराष्ट्र अशांत करण्याचा प्रयत्न करत आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहेच.

१ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून देखील जागतिक पातळीवर साजरा केला जातो, १८९१ पासून जागतिक पातळीवर कामगार दिन साजरा होण्यास सुरुवात झाली तर देशात पहिल्यांदाच १९२३ साली मद्रास येथे कामगार दिन साजरा झाला. जगभरात ८० हुन अधिक देशात कामगार दिन साजरा होत आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली ही शहरे ४०-४५ वर्षापुर्वी कामगारांची शहरे म्हणून ओळखली जात.देशाच्या राज्याच्या विकासात कामगारांचे देखील तितकेच योगदान आहे. अनेक कामगार चळवळी या काळात घडल्या. कै. श्रीपाद अमृत डांगे, कै. जॉर्ज फर्नांडिस, कै. दत्ता सामंत अशा अनेकांनी आपले जीवन कामगार चळवळी साठी वाहुन घेतले. मात्र आर्थिक उदारीकरणाच्या काळात भांडवलशाहीला झुकते माप देत कामगारांचा आवाज दडपणे सुरू झाले, त्यासाठी कायद्यात बदल केले गेले. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी अनेक कामगार कायदे बदलले गेले काहींना स्थगिती दिली गेली. एकुणच कामगार दिनानिमित्त कामगार, कर्मचारी वर्गावर अन्यायच होत असल्याची सार्वत्रिक भावना निर्माण झाली आहे. आजच्या घडीला ना नोकरीची शास्वती ना भविष्याची खात्री. आजची नोकरी केवळ गुलामगिरी झाली आहे आणि कामगार दीन आहे असे काहिसे चित्र निर्माण झाले आहे. दरवर्षी लाखो यूवक हातात डिग्री घेऊन कामाच्या शोधात वणवण भटकत आहेत. आर्थिक मंदी, एआय तंत्रज्ञान यामुळे आहे त्यांच्या नोकऱ्या धोक्यात आहेत, या सगळ्यांचे भविष्य अधांतरी आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा होत आहे.

**मंगल देशा, पवित्र देशा...**
**प्रणाम घ्यावा माझा...**
**श्री महाराष्ट्र देशा...**

**जय महाराष्ट्र !!!**

## महान राष्ट्र

खुशाल रहा इथे
रे सगे सोयरे इष्ट
आगताचे स्वागत
सुखे करे महाराष्ट्र

हुतात्म्यांना नमन
संपदावर्षेसहासष्ट
अग्रभागी हा दिसे
येता कुठले अरिष्ट

गुंतवून मनेआपले
फळे खारे स्वादिष्ट
उत्तर मिळे इथेचं
समस्या येई क्लिष्ट

तोडू पाही एकता
नाठाळ ते छंदिष्ट
शिक्षणअलौकिक
भूक शमते संतुष्ट

बॉलिवूड सोनसंधी
कलाकार बने श्रेष्ठ
असंख्य क्षेत्रांमध्ये
घडवले किती जेष्ठ

प्रगति गती सर्वांची
इथले उदार उदीष्ट
उध्दार रे पिढ्यांचा
रहालं जर एकनिष्ठ

अस्मिते बोट लावी
करू नकात धारिष्ट
अंगायेता शिंगा घेई
जाणा काय जे इष्ट

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** नवीन चंद्रपूर परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तब्बल १४४ कोटी ३८ लाख ३४ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असून, आ. किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले आहे. या निधीतून म्हाडा अंतर्गत दाताळा, कोसारा, पडोली या भागांमध्ये मुख्य डीपी रस्ते, स्ट्रीट लाईट, बंदिस्त नाली आदी मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

नवीन चंद्रपूर परिसरात वाढत्या वसाहतींमुळे पायाभूत सुविधांची तीव्र गरज निर्माण झाली होती. रस्ते, नाल्या व प्रकाश व्यवस्था यासारख्या मूलभूत सोयींच्या अभावामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत आ. किशोर जोरगेवार यांनी या प्रश्नावर विशेष लक्ष केंद्रित करून शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला.

या संदर्भात त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. पुढे एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री झाल्यानंतरही आ. जोरगेवार यांनी त्यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवत निधी मंजुरीसाठी प्रयत्न सुरू ठेवले.

दरम्यान, आ. किशोर जोरगेवार यांनी २२ मे २०२५ रोजी नागपूर येथील म्हाडा कार्यालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत म्हाडा नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश कुमार मेघमाडे, कार्यकारी अभियंता दीप्ती काळे, अभियंता मोनिका थोटे, एडीटीपी भाग्यश्री टाक विद्युत विभागाचे उपअभियंता चंद्रशेखर वानखेडे व करण नायर उपस्थित होते. या बैठकीत विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यानंतर मुंबई मंत्रालयात ७ मे २०२५ ला म्हाडा गृहनिर्माणचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्यासोबतही आ. किशोर जोरगेवार यांनी बैठक घेतली. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना विकास आराखडा तयार करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. या सर्व प्रयत्नांनंतर आता या विकासकामांसाठी निधी मंजूर झाला असून, लवकरच प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार आहे. या प्रकल्पामुळे नवीन चंद्रपूर परिसरातील नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळणार असून, परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

# महाराष्ट्राच्या मावळ्यांचे जिंजीकडे प्रस्थान

## १ हजार १३३ स्वयंसेवकांचा समावेश; आपला मावळा'ची सीमापार गडकोट संवर्धन मोहीम




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** शहरातील कायनेटिक चौक येथे बुधवारी शिवकालीन गडकोट संवर्धन मोहीम अंतर्गत तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याकडे रवाना होणाऱ्या स्वयंसेवकांच्या बसेसचे ध्वजप्रदर्शन आणि प्रस्थान सोहळा उत्साहात पार पडला. खासदार निलेश लंके आणि शिवसेना नेते प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते नारळ फोडून भगवे झेंडे दाखवत बसेस रवाना करण्यात आल्या. तब्बल १ हजार १३३ मावळ्यांच्या उपस्थितीने परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

महाराष्ट्राच्या सीमांबाहेर प्रथमच गडकोट संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात येत असून तामिळनाडूतील जिंजी किल्ला येथे स्वच्छता, संवर्धन आणि जतनाची कामे करण्यात येणार आहेत. सुमारे १ हजार २०० किलोमीटरचा एकमार्गी आणि एकूण २ हजार ४०० किलोमीटरचा हा प्रवास आपला मावळा संघटनेची आतापर्यंतची सर्वात मोठी आणि दूरची मोहीम ठरत आहे. आवश्यक साहित्य व उपकरणांसह स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी रवाना झाले असून महाराष्ट्र दिन जिंजी किल्ल्यावर साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या जिंजी किल्ल्याला छत्रपतींच्या कालखंडात विशेष स्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य परंपरेशी जोडलेला हा किल्ला पुढे छत्रपती राजाराम महाराज यांच्या संघर्षकाळात तात्पुरती राजधानी म्हणून ओळखला गेला. त्यामुळे या ऐतिहासिक स्थळी संवर्धनाची मोहीम राबविणे प्रत्येक मावळ्यासाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

प्रा.शशिकांत गाडे यांनीही या उपक्रमाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे सांगत,ही मोहीम केवळ स्वच्छपुरती मर्यादित नसून, सांस्कृतिक जतन आणि इतिहासाची जाणीव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारी असल्याचे अधोरेखित केले.

प्रस्थान सोहळ्यास सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, नगरसेवक योगीराज गाडे, अल्ताफ शेख, सचिन पठारे, समीर वडजे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**राज्यातील १४ गडांवर यशस्वी मोहीम - खा. निलेश लंके**

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके यांनी गडकोट हे इतिहास व स्वाभिमानाचे प्रतिक असल्याचे सांगत, महाराष्ट्रातील १४ गडांवर यशस्वी मोहीम राबवल्या नंतर आता राज्याच्या सीमा पलीकडे जाऊन वारसा जपण्याचा संकल्प पूर्ण होत असल्याचे नमूद केले. जिंजी किल्ल्यावर सेवा करणे हे भाग्याचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# अहिल्यानगर सिव्हिल आता होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय




## यंदापासून सुरू होणार कॉलेज

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया'च्या निर्मिती प्रक्रियेला वेग आला आहे. सिव्हिल हॉस्पिटल हे सात वर्षांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. त्यासंदर्भात राष्ट्रीय वैद्यकीय कौन्सिलचे पथक तपासणीसाठी येणार आहे.

त्या पार्श्वभूमीवर हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारावरील फलक बदलला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय असे त्याचे नामकरण करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. चौंडीमध्ये मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या हॉस्पिटलबाबत घोषणा केली होती. त्यानंतर त्यास गती मिळाली. जिल्ह्यातील हे पहिलेच शासकीय मेडिकल कॉलेज ठरणार आहे. या महाविद्यालयात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमता असेल. सोबतच ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्याचे आदेश शासनाने काढले आहेत.

त्यासाठीची पदनिर्मिती, संबंधित असलेली बांधकामे आदींसाठी सुमारे ४८५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्थावर जंगम मालमत्ता व मनुष्यबळासह, तात्पुरत्या स्वरूपात किमान सात वर्षांसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास निःशुल्क वापरण्यासाठी दिले जाणार आहे.

**"कार्यवाही प्रगतिपथावर"**

अहिल्यानगरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ४४८ पदांची निर्मितीबाबतचा शासकीय अध्यादेश (जीआर) ८ एप्रिलला काढण्यात आला आहे. त्यानुसार गट अ साठी ४८ ,गट ब साठी ४४ गट क साठी ९३ अशी १८५ नियमित पदे असणार आहेत, तर ५९ विद्यार्थी पदे आहेत. महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी आवश्यक असणारी स्वच्छता, आहार, सुरक्षा, वस्त्र स्वच्छता ही सर्व कामे बाह्यस्त्रोताद्वरे केली जाणार आहेत. त्याद्वारे २०४ पदे भरण्याचे नियोजन आहे. या वैद्यकीय महाविद्यालयात पुढच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश लांब यांनी दिली.

**"जागेसाठी लवकरच बैठक"**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दृष्टीने कळीचा मुद्दा ठरलेली बाब म्हणजे जागा निश्चिती. यासाठी अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी महाविद्यालयासाठी विविध ठिकाणी जागा सुचविल्या होत्या. याबाबत समितीची गेल्या महिन्यात बैठक होणार होती. मात्र राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक लागल्याने ती स्थगित झाली होती. आता आचारसंहिता संपल्यानंतर ती बैठक पुन्हा होणार आहे. त्यात जागेबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे.

# लंडनच्या लेडी मेयर डेम ससून लँगली यांनी घेतली मुख्यमंत्री यांची सदिच्छा भेट




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, मुंबई :** सिटी ऑफ लंडनच्या लेडी मेयर डेम सूसन लँगली तसेच यूकेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मुंबई व महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी अग्रगण्य केंद्र असल्याचे अधोरेखित करत उत्पादन क्षेत्रासोबतच 'एज्युसिटी' आणि 'मेडीसिटी' सारख्या नव्या संकल्पनांमधील संधींवर विशेष भर देण्यात आला.

लेडी मेयर डेम सुसन लँगली यांनी लंडन हे जागतिक भांडवल उभारणीसाठी महत्त्वाचे केंद्र असल्याचे सांगत महाराष्ट्रातील उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तारासाठी लंडन एक विश्वासार्ह व्यासपीठ ठरू शकते, असे मत व्यक्त केले. भारत–यूके मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन आर्थिक भागीदारीस चालना मिळेल, असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.यूकेचे प्रधानमंत्री केयर स्ट्रामेर यांच्या अलीकडील मुंबई भेटीदरम्यान उद्योग क्षेत्रातील दिग्गजांशी झालेल्या चर्चेचा सकारात्मक परिणाम आता गुंतवणूक प्रस्तावांमध्ये दिसून येत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

'मुंबई' आणि 'लंडन' या जागतिक शहरांमधील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी संरचित संवाद यंत्रणा उभारण्याबाबत ही चर्चा झाली. भारत–यूके मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर उद्योग, पायाभूत सुविधा व शाश्वत वित्तीय क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. या भेटीत भविष्यात अधिक व्यापक सहकार्याच्या संधी शोधण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली.

# मिसिंग लिंक रोडला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर नाव देण्याची मागणी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३०, अहिल्यानगर :** मुंबई–पुणे मिसिंग लिंक रोडचे १ मे रोजी होणारे उद्घाटन लक्षात घेता, या महत्त्वाकांक्षी मार्गाला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे, अशी ठाम व एकमुखी मागणी सकल धनगर समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन ई–मेलद्वारे पाठवून शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

मुंबई–पुणे या ऐतिहासिक मार्गाच्या उभारणीत शिंग्रोबा धनगर यांचे योगदान अत्यंत मोलाचे व प्रेरणादायी मानले जाते. सुमारे १८५० च्या कालखंडात इंग्रज सत्ताधाऱ्यांना बोरघाटातील दुर्गम व धोकादायक घाटमार्ग शोधण्यात अपयश येत असताना, खोपोली परिसरातील शिंग्रोबा धनगर यांनी अत्यंत धाडसाने व देशभक्तीच्या भावनेतून त्यांना मार्ग दाखविला. मात्र, कोणत्याही प्रकारचे बक्षीस किंवा इनाम स्वीकारण्यास त्यांनी नकार देत माझ्या देशाला स्वातंत्र्य द्या अशी ठाम व निर्भीड मागणी केली. त्यांच्या या स्वाभिमानी व राष्ट्रनिष्ठ भूमिकेमुळे संतप्त झालेल्या इंग्रजांनी त्यांची निर्दयपणे गोळ्या घालून हत्या केली. हा प्रसंग भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका अनामिक पण तेजस्वी बलिदानाचे प्रतीक म्हणून आजही स्मरणात आहे. ज्या बोरघाट परिसरात ही घटना घडली, त्याच ठिकाणी आज शिंग्रोबा धनगर यांचे मंदिर उभे असून, ते भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. खंडाळा घाट परिसरातील हे मंदिर दरवर्षी हजारो भाविकांना आकर्षित करत असून, त्यांच्या स्मृतींचे जतन करणारे प्रेरणास्थान ठरत आहे. यापूर्वी मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गाला शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली होती.

# बागेश्वर बाबांचा नाशिकमधील कार्यक्रम रद्द करा; अंनिसचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, विंचूर (नाशिक) :** प्रसिद्ध कथावाचक धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ'बागेश्वर धाम बाबा'यांचा येत्या २ मे रोजी नाशिकमध्ये होणारा नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) जिल्हाधिकार्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. शास्त्री हे अंधश्रद्धेला खतपाणी घालत असून त्यांनी महाराष्ट्रातील संत व महापुरुषांचा वारंवार अपमान केला असल्याचा आरोप समितीने केला आहे.महापुरुषांचा अवमान आणि कायद्याचे उल्लंघनजिल्हाधिकार्यांना दिलेल्या निवेदनात 'अंनिस'ने म्हटले आहे की, धीरेंद्र शास्त्री हे धार्मिक प्रवचनाच्या नावाखाली महाराष्ट्रात येतात, मात्र आपल्या भाषणातून संत शिरोमणी तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरून त्यांचा अपमान करतात. हा केवळ संतांचा अपमान नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेवर झालेला आघात आहे.तसेच, लोकांच्या मनातील प्रश्न ओळखणे आणि दैवी शक्तीने उत्तरे देण्याचे त्यांचे दावे भारतीय संविधानातील'वैज्ञानिक दृष्टिकोन'या मूल्याच्या पूर्णतः विसंगत आहेत. महाराष्ट्रातीलजादूटोणाविरोधी कायद्याचेहे सरळ उल्लंघन असल्याचे समितीचे ठाम मत आहे.२१ लाखांचे जाहीर आव्हान'अंनिस'ने धीरेंद्र शास्त्री यांना त्यांचे चमत्कार सिद्ध करण्याचे खुले आव्हान दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार:शास्त्री यांनी सरकारी अधिकारी, तज्ज्ञ आणि पत्रकारांच्या उपस्थितीत आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर आपले दावे सिद्ध करावेत.समितीने दिलेल्या १० व्यक्तींच्या मनातील प्रश्न ओळखून त्यांचे नाव, गाव आणि पत्ता सांगावा.हे सिद्ध केल्यास समितीच्या वतीने त्यांना२१ लाख रुपयांचे पारितोषिकदेण्यात येईल. सार्वजनिक ठिकाणी चमत्कार सिद्ध करण्याचा हट्ट धरणे ही केवळ एक 'पळवाट' असून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही समितीने म्हटले आहे.




आंदोलनाचा पवित्राजर प्रशासनाने या भोंदूबुवाचा कार्यक्रम रद्द केला नाही, तर महाराष्ट्र अंनिस आणि इतर समविचारी संघटनांच्या वतीने लोकशाही मार्गाने आणि शांततेत आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर 'अंनिस'चे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे आणि बुवाबाजी संघर्ष विभागाचे महेंद्र दातरंगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा समारोप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, बुलढाणा :** जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आज 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६' चा समारोप समारंभ संपन्न झाला. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा




मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी विधानसभा आमदार संजय गायकवाड, श्वेता महाले, मनोज कायंदे, सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, विभागीय वन अधिकारीजमीर शेख, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, तसेच जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता शीराम हजारे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# दिवा-मुंब्रा-कळव्यात १७८ कोटींचा रस्ते घोटाळा; कामे न करताच कंत्राटदारांच्या खिशात कोट्यवधी

## कार्यकारी अभियंता दीपक माने यांच्यावर मनसेचा गंभीर आरोप; श्वेतपत्रिका काढण्याची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा, मुंब्रा, कळवा आणि वागळे इस्टेट प्रभाग समिती क्षेत्रात विशेष निधीतून मंजूर झालेल्या १७८ कोटी रुपयांच्या १७ रस्ते विकास कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा खळबळजनक आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे यांनी केला आहे. अनेक ठिकाणी कामाला सुरुवातही न करता कंत्राटदारांना कोट्यवधींची बिले अदा करण्यात आली असून, या संपूर्ण प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक माने यांचा थेट सहभाग असल्याचा दाट संशय मनसेने व्यक्त केला आहे.

या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून संपूर्ण श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणी करणारे निवेदन गावडे यांनी ठाणे महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांना दिले आहे.

**४ महिन्यांपूर्वीच आयुक्तांना तक्रार, तरीही कारवाई नाही...**

या कामांमधील गैरव्यवहारांची चौकशी व्हावी यासाठी मनसेचे विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी १२ डिसेंबर २०२५ रोजीच तत्कालीन आयुक्त सौरभ राव यांना लेखी तक्रार दिली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. माहिती अधिकारात अर्ज करूनही संबंधित कामांची माहिती देणे विविध कारणे सांगून वारंवार टाळण्यात येत आहे, असा आरोप गावडे यांनी केला.

**१७८ कोटींची कामे, पण प्रत्यक्षात किती झाली?**

दिवा प्रभाग समिती अंतर्गत विशेष निधीतून मंजूर झालेल्या १७ रस्ते कामांचा एकूण अंदाजित खर्च सुमारे ₹१७८ कोटी आहे. प्रत्यक्षात अनेक कामे पूर्ण झालेली नाहीत, तर काही ठिकाणी कामे सुरूहा झालेली नाहीत.

**मनसेच्या ४ प्रमुख मागण्या :**
१) सर्व १७ रस्ते कामांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करा.
२) आतापर्यंत कंत्राटदारांना किती रक्कम अदा केली, याची माहिती जाहीर करा.
३) कार्यकारी अभियंता दीपक माने यांच्या भूमिकेची चौकशी करून कारवाई करा.
४) संपूर्ण प्रकरणाची श्वेतपत्रिका जनतेसमोर ठेवा...

तरीही कंत्राटदारांना बिले काढून रक्कम अदा करण्यात आली आहे, असे मनसेचे म्हणणे आहे.

**'करदात्यांच्या पैशाचा हिशोब द्या'**

ज्या रस्त्यांच्या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा संशय आहे, त्याची माहिती आम्ही माहिती अधिकारात मागवली, पण ती देणे टाळले जात आहे. आतापर्यंत कंत्राटदारांना किती रक्कम अदा करण्यात आली, काम न करताच बिले कशी काढण्यात आली, याची संपूर्ण श्वेतपत्रिका जाहीर करावी. करदात्यांच्या पैशाचा दुरुपयोग कसा झाला हे जनतेला कळाले पाहिजे, अशी मागणी गावडे यांनी केली.

**घोटाळ्याच्या भोवऱ्यातील १७ रस्ते कामे :**

१) कल्याण-डोंबिवली मुख्य रस्ता ते डायघर गावातील स्मशानभूमी आरक्षण भूखंड क्र. २ पर्यंत २५ मी. रुंद रस्ता.

२) बी.एस.यू.पी. बिल्डिंग ते कौसा मार्केट ते स्टेडियमपर्यंत ३० मी. डी.पी. रस्ता.

३) सेक्टर ११, कल्याण फाटा जंक्शन येथील दत्त मंदिरामागील २५ मी. डी.पी. रस्ता व जुना मुंबई-पुणे रस्त्यास जोडणारा ३० मी. डी.पी. रस्ता.

४) रिव्हरवूड पार्क ते सागर्ली येथील बी.एस.यू.पी. प्रकल्पाकडे जाणारा २५ मी. रुंद डी.पी. रस्ता.

५) शिळ फाटा जंक्शन ते दिवा आगासन जंक्शनपर्यंत डी.पी. रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम.

६) दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील अस्तित्वातील रस्त्यांचे बांधकाम व सुदृढीकरण.

७) दिवा रेल्वे स्थानक पूर्व ते दातिवली रेल्वे क्रॉसिंगपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण.

८) दिवा शिळ रोड ते दिवा आगासन रस्त्यापर्यंत टाटा पॉवर लाईन्स समांतर रस्त्याचे रुंदीकरण.

९) कल्याण-डोंबिवली रोड पडले गाव ते म्युनिसिपल हाऊसिंग आरक्षण क्र. १ ते हॉस्पिटल आरक्षण क्र. २ ते आगासन देसाई रोडपर्यंत २० मी. व ३० मी. रुंद रस्ता.

१०) डोमखार, शिळ-दिवा रस्त्यापासून पोलीस स्टेशन आरक्षण क्र. १ पर्यंत १२ मीटर रस्ता.

११) शिळ-दिवा रोड खार्डी जंक्शन ते पडले गावापर्यंत ३० मीटर रुंद विकास रस्ता.

१२) खारेगाव नाका ते कै. आत्माराम पाटील चौकापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण.

१३) कळवा प्रभागातील खारेगाव, पारसिक येथील ६० मी. डी.पी. रस्ता व बाजूच्या ३० मी. व २५ मी. रस्ते.

१४) वागळे मुख्य रस्त्याचे मॉडेला जंक्शन ते आय.टी.आय. जंक्शनपर्यंत बांधकाम.

१५) मुंब्रा स्टेशनजवळील दत्तवाडी येथील १२ मी. रुंद डी.पी. रस्ता.

१६) दत्तवाडी ते मुंब्रा बायपास रस्त्याचे काँक्रिटीकरण.

१७) मिनार रेसिडेन्सी ते कल्याण-डोंबिवली शिळ रोडपर्यंत डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण.

# रिमोट ऑपरेटिंग बोया द्वारे समुद्रात बुडणाऱ्या दोन पर्यटकांना जीवदान

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, अलिबाग (रायगड) :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यामुळे आज काशीद समुद्रकिनारी एक मोठा अनर्थ टळला. पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडणाऱ्या डोंबिवली येथील दोन पर्यटकांना 'रिमोट ऑपरेटिंग बोया'च्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. फुरकन शेख (वय २८) आणि कैफ शेख (वय २२) अशी या वाचवलेल्या पर्यटकांची नावे असून, हे दोघेही सध्या सुस्थितीत आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, डोंबिवलीहून आलेले हे पर्यटक काशीद बीचवर पर्यटनासाठी आले होते. समुद्रात पोहण्याचा आनंद घेत असताना अचानक दोघेही खोल पाण्यात ओढले गेले आणि बुडू लागले. यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल रोटकर आणि जीवरक्षक शिवम लाड यांनी



तत्परता दाखवत परिस्थिती हाताळली.

विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून नुकत्याच आपत्ती व्यवस्थापन विभागाला प्राप्त झालेल्या अत्याधुनिक 'रिमोट ऑपरेटिंग बोया'चा वापर या बचावकार्यात करण्यात आला. या उपकरणाच्या अचूक वापरामुळे जीवरक्षकांना बुडणाऱ्या पर्यटकांपर्यंत वेगाने पोहोचणे शक्य झाले आणि त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या निधीतून नुकतेच १२ एप्रिल २०२६ रोजी नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या वर्दळीच्या समुद्रकिनाऱ्यांसाठी या रिमोट ऑपरेटिंग बोयांचे वाटप करण्यात आले होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या दूरदृष्टीमुळे उपलब्ध करून देण्यात आलेले हे तंत्रज्ञान पहिल्याच काही दिवसांत दोन व्यक्तींचे प्राण वाचवण्यासाठी मैलाचा दगड ठरले आहे. या यशस्वी बचावकार्यानंतर दोन्ही पर्यटकांना त्यांच्या नातेवाईकांच्या मदतीने पुढील वैद्यकीय उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या संकटसमयी पोलिसांनी आणि स्थानिक जीवरक्षकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कुसुंबी व नोकारी येथे प्रत्यक्ष पाहणी करुन होणार मोजणी, योग्य मार्ग काढण्यासाठी सकारात्मक बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** अल्ट्राटेक सिमेंट कंपनी (माणिकगड सिमेंट) क्षेत्रातील जमिनीच्या संदर्भात बांबेझरी, कुसुंबी आणि नोकारी येथील शेतकऱ्यानी मांडलेल्या विषयावर जिल्हा प्रशासन गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने तोडगा काढत आहे. या संदर्भात बुधवारी (दि.२९) जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या अध्यक्षतेखाली गावातील शेतकरी तसेच माणिकगड सिमेंट कंपनीच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली. विशेष म्हणजे कुसुंबी आणि नोकारी येथे प्रशासनाचे अधिकारी, शेतकरी आणि कंपनीच्या प्रतिनधींसमोर जमिनीची मोजणी करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वसूमना पंत यांनी स्पष्ट केले. यावर उपस्थित शेतकऱ्यानी समाधान व्यक्त केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, राजुराचे उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, उपजिल्हाधिकारी (जमीन) सचिन कुमावत, भुमी अभिलेख जिल्हा अधिक्षक प्रदीप जगताप, तहसीलदार ओमप्रकाश गोंड ( राजुरा), रुपाली मोगरकर (जिवती), पल्लवी आकरे (कोरपना), उपविभागीय पोलिस अधिकारी जाधव, पोलिस निरीक्षक शिवाजी कदम यांच्यासह माणिकगड कंपनीचे व्यवस्थापक मुकेश गहलोत, शेतकऱ्याच्या वतीने आबिद अली, भाऊराव कन्नाके, केशव कुडमेथे, सुनील मडावी, सुनील पेंदोर उपस्थित होते.

प्रशासन शेतकऱ्याच्या बाजुने आहे, कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नका, असे सांगून जिल्हाधिकारी वसुमना पंत म्हणाल्या, शेतकऱ्यांप्रती प्रशासनाची भुमिका अतिशय सकारात्मक आहे. एक महिन्याच्या आत बांबेझरी यथे मौका चौकशी करून तेथे कंपनीचे ओव्हर बर्डन आहे का, याची तपासणी केली जाईल. तसेच मंडळ अधिकारी, तलाठी, भुमी अभिलेख सर्व्हेअर, वन विभागाचे प्रतिनिधी, पोलिस पाटील, माणिकगड कंपनीचे अधिकारी आणि जमिनीचा गट क्रमांक / सातबारा ज्या शेतकऱ्याच्या नावावर आहे, त्यांच्या समक्ष कुसुंबी व नोकारी येथे मोजणी करून फोटोसह अहवाल सादर करतील. याबाबत शेतकऱ्याना अजूनही काही अडचण असेल तर पुन्हा बैठक घेण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यानी स्पष्ट केले.

मौजा कुसुंबी, बांबेझरी व नोकारी येथील काही शेतक-यांच्या जमिनी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या उत्खनन क्षेत्रामध्ये (लिज) येत असून त्याकरीता मोबदला देण्यात



यावा, अशी मागणी गत काही वर्षांपासून शेतकरी सातत्याने करीत आहे. हा विषय सकारात्मक दृष्टीने निकाली काढण्याच्या उद्देशाने यापूर्वी उपविभागीय अधिकारी, राजुरा यांच्या स्तरावर संबधित शेतकरी व कंपनीचे प्रतिनिधी यांच्यासोबत बैठका घेवून कार्यवाही करण्यात आली.

तसेच ३ डिसेंबर २०२४ रोजी भूमापन क्र. ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८ ची मौक्यावर प्रत्यक्ष मोजणी करण्यात आली. त्यामध्ये सदर भुमापन क्रमांकामध्ये अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे कोणत्याही प्रकारचे उत्खनन आढळून आले नाही. तसेच संबंधित शेतक-यांची कोणत्याही प्रकारची वहिवाट सदर भुमापन क्रमांकावर आढळून आले नाही तसा अहवाल उपअधिक्षक भूमी अभिलेख राजुरा यांनी सादर केला आहे. उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग चंद्रपुर यांनी मौजा बांबेझरी येथील स. क्र. ४४, ४५, ४६, ४७ व ४८ हे संपूर्ण क्षेत्र जंगलाने व्याप्त असून शेती योग्य नाही व वनव्यवस्थापन नकाशा व केएमएल नुसार राखीव वनक्षेत्र क्रमांक ३६ मध्ये असल्याचे नमुद केले आहे.

सध्या हे प्रकरण दिवाणी न्यायालय, चंद्रपूर येथे दाखल असून या प्रकरणात दिवाणी न्यायालयाने २६ डिसेंबर २०२५ रोजी अंतरिम ऑर्डर पारीत केले आहे. तसेच राज्य मानवी हक्क आयोगासमोर सदर प्रकरण प्रलंबित आहे. न्यायालय जो निर्णय देईल, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास जिल्हा प्रशासन कटिबध्द आहे. न्यायप्रविष्ठ बाब असल्याने प्रशासकीय मर्यादा असल्या तरी, शेतक-यांच्या न्याय्य हक्कासाठी शासन कायदेशीर चौकटीत राहून सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे, असेही बैठकीत सांगण्यात आले.

# थोडक्यात

## शिंदे (शिवसेना) गटाचा सुफडा साफ पोटनिवडणुकित परिवर्तन आघाडीचे वर्चस्व...



**अक्षराज : स्वप्नील देशमूख**

**दि.३०, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोथळ खलाटीची पोट निवडनुक दिनांक २८/४/२०२६ रोजी पार पडली. दोन जागे साठी ही पोट निवडनुक झाली.

प्रभाग क्रमांक १ मद्धे परिवर्तन विकास आघाडी कडून आशिष सुरेश देशमुख विरुद्ध शिंदे शिवसेना कडून मयूर समीर देशमुख अशी थेट लढत झाली.मिळालेली मते आशिष सुरेश देशमुख २५३ मते तसेच मयूर समीर देशमुख यांना मिळालेली मते ८ नोटा ६.तसेच सर्व साधारण महिले साठी परिवर्तन विकास आघाडी कडून स्नेहा स्वप्नील देशमुख विरुद्ध शिंदे गटा कडून श्रुती समीर दळवी ही निवडणुकीच्या आखाड्यात उभे होते सुरवातीला अटीटतीचीं वाटणारी निवडणूक मात्र सहज पार पडली. मिळालेली मते स्नेहा स्वप्नील देशमुख यांना मिळालेली मते.२४४ तसेच श्रुति समीर दळवी यांना मिळालेली मते १० व नोटा १३ ही निवडणूक एक तर्फी परिवर्तन विकास आघाडी यांच्या बाजूने लागला. निकाल लागल्या नंतर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. व प्रशासकीय भवन येथे मोठी फाटक्यांची आतिषबाजी केली तसेच मिरवणूक काढली. हा विजय सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आहे असे दोन्ही वीजयी उमेदवाराचे म्हणणे आहे.

## नेमगिरी रस्ता व नाली बांधकामाचे उद्घाटन




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.३०, जिंतूर :** शहरातील नेमगिरी रस्ता परिसरात रस्ता व नाली बांधकाम कामांचा शुभारंभ नगराध्यक्ष प्रताप देशमुख व नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून पावसाळ्यातील अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.

नेमगिरी रस्ता ते परिसरातील अंतर्गत भागांमध्ये अनेक वर्षांपासून रस्त्याची दुरवस्था व नाल्यांची अपुरी व्यवस्था यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात पाणी साचणे, चिखल होणे तसेच वाहतुकीत अडथळे निर्माण होणे या समस्या वारंवार निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेच्या वतीने रस्ता व नाली बांधकामाचा निर्णय घेण्यात आला असून, आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सुविधांवर भर देणे आवश्यक असून, दर्जेदार काम वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. या कामामुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यासोबतच नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुलभता निर्माण होणार आहे.या कार्यक्रमाला नगरसेवक शेख इस्माईल पहलवान, नगरसेवक याहिया बेग, नगरसेवक करीम लाला तसेच माजी नगरसेवक अब्दुल रहेमान लाडले आदींसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## चिमूर तालुक्यात जनगणनेची प्रक्रिया सुरु : तहसीलदार राजमाने



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.३०, चिमूर :** केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या जनगणनेअंतर्गत चिमूर तालुक्यात जनगणना प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. तहसील कार्यालय चिमूर जाहीर सूचनेद्वारे नागरिकांना याबाबत माहिती देत स्वगणना करण्याचे आवाहन केले.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरगणना १६ मे ते १४ जून या कालावधीत पार पडणार आहे. यासाठी प्रगणक व पर्यवेक्षक घरभेटी देणार आहेत.

मात्र त्याआधी मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना https://se.census.gov.in/ या संकेत स्थळावर ऑनलाइन स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्वगणना सुविधेमुळे नागरिकांना स्वतःहून अचूक माहिती भरता येणार असून वेळेची बचत होणार आहे.

तसेच माहितीतील त्रुटी कमी होऊन शासनाला विकास आराखड्यासाठी विश्वासार्ह माहिती उपलब्ध होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.

जनगणना कायदा १९४८ नुसार प्रत्येक कुटुंब व प्रमुख यांना माहिती देणे बंधनकारक असून नागरिकांनी अचूक माहिती देणे आवश्यक आहे.

दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून तिचा वापर कोणत्याही कर किंवा इतर चौकशीसाठी केला जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**SE ID प्रगणकास दाखवणे आवश्यक राहणार....**

नागरिकांनी १ मे ते १५ मे स्वगणनेसाठी अधिकृत संकेतस्थळ किंवा संबंधित पोर्टलला भेट देऊन मोबाइल क्रमांकाद्वारे नोंदणी करावी. त्यानंतर कुटुंबातील सदस्यांची माहिती भरून फॉर्म सबमिट केल्यानंतर १६ अंकी आयडी प्राप्त होणार आहे.हा आयडी प्रगणकास दाखवणे आवश्यक राहणार आहे.

ऑनलाइन प्रक्रिया करता न आल्यास सीएससी. आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत किंवा इंटरनेट सेंटरच्या माध्यमातूनही स्वगणना करता येणार आहे.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी आपली स्वगणना करण्याचे आवाहन श्रीधर राजमाने तहसिलदार चिमूर यांनी केले आहे.